# :— प्रेस नोट —:

## भांडुप पोलीस ठाणे गु.र.नं.५०३/२०२२ कलम ३०२ भांदवि गुन्हयातील आरोपीतांना ०३ तासात अटक करण्यात भांडूप पोलीसांना यश.

दिनांक २६/०७/२०२२ रोजी ०६.३४ वा सुमारास भांडुप पोलीस ठाणे मोबाईल क्र. ०१ यांना मुख्य नियत्रंण कक्ष येथुन संदेश प्राप्त की, राधा कृष्ण चाळ जवळ, डी.पी स्टार बिल्डींग समोर, समर्थ गार्डन रोड, दत्त मंदीर रोड, व्हिलेज रोड, भांडुप (प) मुंबई एक जखमी इसम बेशुध्द अवस्थेत पडला आहे. असा संदेश प्राप्त होताच भांडुप पोलीस ठाणे मोबाईल क्र ०१ वरील सफौ दिपक मोरे व स्टॉफ घटनास्थंळी पोहचले असता जखमी इसमांस बेशुध्द अवस्थेत मुलुंड जनरल हॉस्पिटल, मुलुंड, मुंबई येथे आणले असता तेथील डॉ. यांनी दाखल पुर्वी मयत घोषित केले. प्राथमिक चौकशीत सदर मयत इसम नामे विनोद विलास साटम वय ३८ वर्षे, रा.ठि रूम.नं. गुरखा चाळ, शिवनगर, लेक रोड, मयुरेश रेसीडेन्सी समोर, भांडुप (प) मुंबई यांचा खुन झाल्याचा निष्पन्न झाल्याने भांडुप पोलीस ठाणेचे सपोनि प्रविण फणसे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली असता गुरनं ५०३/२०२२ कलम ३०२ भांदवि अन्वये गुन्हा नोंद.

गुन्हे प्रकटीकरण पथक, निगराणी पथकामधील अधिकारी व अंमलदार यांनी पाहिजे आरोपीचा शोध घेत असतांना तांत्रिक तपासाच्या आधारे तसेच गुप्त बातमीदार कडुन मिळालेल्या खात्रीलायक माहीती वरून शोध घेवून आरोपी महिला नामे श्रीमती बिशनु तेकबहादूर भंडारी वय ४२ वर्षे, हिस ताब्यात घेवून पोलीस ठाणेस आणले असता त्याच्याकडे गुन्हयाचे अनुषंगांने कौशल्यपुर्वक विचारणा केली असता तिने सदरचा गुन्हा तिचा मुलगा नामे कुमार समीर विनोद साटम वय १३ वर्षे, (विधी संघर्ष बालक), भाऊ नामे राजेंद्र तेकबहादूर भंडारी वय ६० वर्षे, मुलगी नामे सौ. लक्ष्मी योगेश कदम वय २८ वर्षे, जावई नामे योगेश राजू कदम २५ वर्षे, श्री सतिष प्रेमकुमार प्रयाल वय ४६ वर्षे (रिक्षा चालक) यांनी संगणमत करून क्रिकेटची बॅट, कुकरच्या झाकणाने व लाथाबुक्याच्या सहाय्याचे मारहाण करून ठार मारल्याचे सांगितले. त्यावरून नमुद पाच आरोपीतांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. तसेच एका विधी संघर्ष बालकास ताब्यात घेण्यात आले आहे.

मयत इसम विनोद साटम हा आरोपी महीला नामे श्रीमती बिशनु तेकबहादूर भंडारी वय ४२ वर्षे हिच्यासोबत लिव्ह इन रिलेशनमध्ये राहत होता. तो तिला तसेच तिच्या मुलास दारूच्या नशेत शारिरीक व मानसिक त्रास, मारहाण, शिवीगाळ करत असल्याने, त्रासाला, छळाला कंटाळुन तिने वरील तिच्या साथिदारांसह गुन्हा केल्याचे तपासात सांगितले आहे.

वरीलप्रमाणे गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सदरची कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील सो, (सह पोलीस आयुक्त का.व सु) मा. श्री संजय दराडे सो, (अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग) मा. श्री. प्रशांत कदम सो, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–७, मुंबई, श्रीमती सुरेखा कपिले, सहाय्यक पोलीस आयुक्त, भांडूप विभाग, मुंबई यांनी वेळोवेळी केलेल्या सुचनां प्रमाणे आणि श्री. नितीन उन्हवणे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, भांडूप पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पोनि अनिल जायकर, सपोनि प्रविण फणसे, पोउपनि विकास जाधव, तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि श्री. स्वप्निल डमरे, पोउपनि अभिजीत टेकवडे व अंमलदार तसेच निगराणी पथकांचे सपोनि आनंद बागडे व पोउपनि विशाल मोरे व अंमलदार यांनी कौशल्यपुर्वक शिताफीने तपास करून केवल ०३ तासाच्या आत खूनाच्या गुन्हा उघडकीस आणला आहे.

Scanned with CamScanner